Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit ... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९० • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२५ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अहेरी विधानसभेवर काँग्रेसचा झेंडा फडकणार:विजय वडेट्टीवार

## हजारोंच्या उपस्थितीत अजय कंकडालवार झाले काँग्रेसवासी;आलापल्ली येथे काँग्रेसची पक्ष प्रवेश सभा संपन्न





**गडचिरोली । प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाने ज्यांना ज्यांना संधी दिली त्यांनी आजपर्यंत पक्षाला धोका दिला आहे.त्यामुळेच अहेरी विधानसभा क्षेत्रात काँग्रेस पक्ष कमकुवत झाला होता .मात्र अजय कंकडालवार आता ही जागा भरून काढणार आहे.विजय आणि अजय ही जोडी आता कमाल करणार असून येत्या विधानसभा निवडणुकीत अहेरी विधानसभा क्षेत्रावर काँग्रेसचा झेंडा फडकणार असल्याचा विश्वास विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.

अहेरी विधानसभा क्षेत्रातील आलापल्ली येथे काँग्रेसच्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी काँग्रेसचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, माजी आमदार डॉ.नामदेव उसेंडी, काँग्रेस कमिटीचे महासचिव डॉ.नामदेव किरसान, मनोहर पोरेटी,विश्वजित कोवासे,महिला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.कविता मोहोरकर, डॉ.नितीन कोडवते,डॉ.चंदा कोडवते,सगुणा तलांडी,रवी शहा,डॉ. निसार हकीम,सोनाली कंकडालवार, सेवानिवृत्त वन संरक्षक एच.जी.मडावी, आविस नेते नंदू नरोटे, बानय्या जणगाम सह सर्व काँग्रेस तालुका अध्यक्ष व आविस पदाधिकारी उपस्थित होते.पुढे बोलताना अजय कंकडालवार यांच्या काँग्रेस प्रवेशाने काँग्रेस पक्ष अहेरी विधानसभा क्षेत्रात आणखी मजबूत झाला असून ही सभा अहेरी विधानसभेच्या परिवर्तनाची सभा असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.एवढेच नव्हेतर तर त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर कडाडून टीका केली.डॉ उसेंडी म्हणाले केंद्र आणि राज्य सरकार मुळे जनता त्रस्त झाली आहे. महागाई वाढत आहे, जातीय तेढ निर्माण करीत आहे.सोबतच त्यांनी विकास कामांवरून व दयनीय झालेल्या रस्त्यांचा दाखला देऊन मंत्री धर्मराव बाबा आत्राम,खा.अशोक नेते यांच्यावरही आरोप केले.डॉ.किरसान म्हणाले की भाजप सरकार फोडाफोडीचे राजकारण करते आणि ईडी व सीबीआयचे भय दाखवून अनेकांना भाजप मध्ये घेत आहेत.महेंद्र ब्राम्हणवाडे म्हणाले की दीपक आत्राम यांना मागील निवडणुकीत एन वेळेवर काँग्रेस तर्फे आम्ही तिकीट दिली. मात्र, ते आमच्याशी कधीच एकनिष्ठ राहले नाही.ज्या मेडिगड्डा प्रकल्प विरोधात तेलंगाणाच्या मुख्यमंत्र्यांना शिव्या देत होते आता फक्त अर्थकारण साठी त्याच बीआरएसच्या मुख्यमंत्र्यांसोबत त्यांच्या पक्षात गेले.अजय कंकडालवार म्हणाले की मी ग्राप पंचायत सदस्य ते जिल्हा परिषद अध्यक्ष बनलो.यात मला नेहमीच काँग्रेसची साथ मिळाली.आदिवासी विद्यार्थी संघाच्या सभेत माजी आमदाराने मला अत्यंत दुय्यम दर्जाची वागणूक दिली आणि माझी जातही काढली. आज तेच दुसऱ्या पक्षात जाऊन आदिवासी जनतेची दिशाभूल करत आहे.मी तळागळातला कार्यकर्ता असून प्रत्येक गावात जातो. मात्र काही लोकं घरातून न निघताच स्वतःला आदिवासी नेते म्हणत आहेत. मी गोर गरिबांच्या पाठीशी असल्याने जनता माझ्या सोबत आहे. त्यामुळेच नुकतेच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत १८ पैकी १३ ग्रामपंचायत निवडून आले.विविध निवडणुकीत सर्व पक्ष एक होऊन माझ्या विरोधात षडयंत्र रचतात.मात्र जनता माझ्या पाठीशी आहे आता फक्त विजय वडेट्टीवार यांची साथ हवी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.दरम्यान विजय वडेट्टीवार यांचे शहरात आगमन हिताचं आदीवासी रेला नृत्याने भव्य स्वागत करण्यात आले. आलापल्ली शहरात भव्य मिरवणूक काढून फटाक्यांची आतषबाजी केले.यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रज्वल नागुलवार यांनी केले.

# संताच्या जीवनचरित्रावर आधारित चित्रपट प्रदर्शित करुन सुदृढ समाज घडवावा-आ . किशोर जोरगेवार



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भगवान शिव व विष्णूंना मानणारे आपल्या देशात वेगवेगळे पंथ आणि परंपरा आहे. फार वर्षापूर्वी ज्या कदाचित एकाच देवतेच्या उपासनेवर जास्त भर देत होते. हर व हरी हे वेगळे नसून एकच आहे. अशी शिकवण संत नरहरी महाराज यांनी दिली असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी कटिबंध संत नरहरी महाराज यांच्यावर आधारित चित्रपट प्रदर्शन कार्यक्रमाच्या प्रसंगी केले.

वेगवेगळ्या पंथातील भेदभावावर मात करण्यासाठी आणि हिंदू सनातन धर्माचा प्रसार करण्यासाठी चंद्रपूर सोनार समाज बहुउद्देशिय संस्थातर्फे कटिबंध संत नरहरी या चित्रपटाचे आयोजन रविवार दि. २४ डिसेंबर २०२३ रोजी प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह, चंद्रपूर येथे प्रदर्शित करण्यात आले. प्रदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटक राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गणपुरे, चित्रपट निर्माता संजय जाधव, गोंडवाना विद्यापीठ सिनेट गजपुरे, सोनार समाज अध्यक्ष प्रफुल चावरे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलतांना ते म्हणाले कि, महाराष्ट्र हि संताची भूमी आहे. प्रत्येक जाती पंथात थोर संत होऊन गेले जे समाजाला दिशा देणारे प्रमुख होते. समाज अर्थाजन करतांना सतमार्गाचा पालन, सदसदविवेकबुद्धीने वागाव, धर्माचे आचरण करावं आणि मानवाला मानव म्हणून एकमेकांना सहकार्याची भावना नेहमी असावी या साठी त्यांनी कार्य केले आहे. या मध्ये संत नरहरी महराज यांना संतश्रेष्ठ म्हणाले गेले आहे. पूर्वीच्या काळी शिव परंपरा मानणारे आणि वैष्णव परंपरा मानणाऱ्यांमध्ये वाद मोठा वाद होता परंतु त्या काळामध्ये शिव व वैष्णव एक आहे त्यांच्यात कुठलाही भेद नाही असे विचार त्यावेळी संत नरहरी महाराज यांनी मांडले होते. त्यामुळे समाज एकवटून धार्मिक व आधात्मिक उन्नतीचा एक सोपानमार्ग संत नरहरी महाराज यांनी सर्व समाजांना दाखविला होता.बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात आजची युवा पिढी धार्मिकतेकडून दुरावली जात असेल तर हे भविष्यासाठी योग्य नाही. त्यामुळे युवकांनीही धार्मिक व आध्यात्मिकतेकडे वळावे त्यासाठी चित्रपटाच्या माध्यमातून संत नरहरी महाराज यांच्यावर आधारित हा चित्रपट आणला आहे. त्यामुळे युवकांना धार्मिक व आध्यात्मिकतेची गोडी लागेल. असे आमदार जोरगेवार यांनी कार्यक्रमात म्हटले. या प्रसंगी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

# विकसीत भारत संकल्प यात्रेदरम्यान केंद्रीय सहसचिवांचा ग्रामस्थांशी संवाद



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

समाजातील तळागाळातील वंचित घटकांना केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती मिळावी,या उद्देशाने'विकसित भारत संकल्प यात्रा'सुरू करण्यात आली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे सहसचिव तथा जिल्हा नोडल अधिकारी आनंद पाटील यांच्या हस्ते गोंडपिपरी तालुक्यातील चेकलिखीतवाडा ग्रामपंचायत येथे संकल्प यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे,शिक्षणाधिकारी (प्राथ.) राजकुमार हिवारे,गोंडपिपरी पंचायत समितीचे संवर्ग विकास अधिकारी गजानन मुंडकर,नायब तहसीलदार राजेश मडापे,चेकलिखितवाड्या सरपंच पुष्पा राऊत,उपसरपंच हरिश्चंद्र मडावी आदी उपस्थित होते. यावेळी सहसचिव पाटील म्हणाले,केंद्र सरकार राबवित असलेल्या कल्याणकारी योजनांची जनतेला माहिती असणे आवश्यक आहे,यासाठी अधिकारी व कर्मचा-यांनी लोकांपर्यंत पोहचावे. आपले जीवनमान उंचावण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी सदैव प्रयत्नरत असावे,असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी कार्यक्रमस्थळी लावण्यात आलेल्या विविध विभागाच्या दर्शनी स्टॉलला भेट देऊन ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच शेतक-यांसाठी ड्रोन फवारणी यंत्राद्वारे अल्प वेळात फवारणी कशी शक्य आहे,याचे प्रात्याक्षिक बघितले.शिक्षणाधिकारी हिवारे यांनी शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणा-या विद्यार्थीहिताच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. श्याम वाखर्डे यांनी आयुष्यमान भारत, पी.एम.विमा, पी.एम.विश्वकर्मा योजना व अन्य योजनांची माहिती दिली. तत्पुर्वी मान्यवरांच्या हस्ते कर्मयोगी गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन गणेश आसेकर व आभार अमित पिरके यांनी मानले. यावेळी सर्व गावकरी,तालुक्यातील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा :**

**“ जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतांना सहसचिव आनंद पाटील म्हणाले,विकसीत भारत संकल्प यात्रेत सर्व विभागांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होवून शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवाव्यात. प्रत्येक विभागाच्या अधिकारी व कर्मचा-यांनी फिल्डवर जावून या यात्रेत सहभाग नोंदवावा. कृषी विभागाने शेतक-यांचे ई-केवायसी व आधार सिडींग करून घ्यावे. तर बँकांनी विविध योजनांचा लाभ गावक-यांना मिळवून देण्यासाठी जिल्हा अग्रणी बँकने गांभिर्यपूर्वक लक्ष द्यावे,अशा सुचना त्यांनी दिल्या. विशेष म्हणजे अतिशय कमी वेळात केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंह पुरी यांचा कार्यक्रम चंद्रपूर येथे आयोजित केल्यामुळे त्यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक देखील केले. बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा,मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन,सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम.,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष पवार,मनपा आयुक्त विपीन पालीवाल,उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळूंके,श्याम वाखर्डे,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे व इतर विभाग प्रमुख उपस्थित होते.**

# गडचिरोलीत विद्यार्थ्यांसाठी उच्चशिक्षणाचा ‘संकल्प’

## डॉ.पंकज नरुले यांचा पुढाकार : देशातील नामांकित विद्यापीठात विद्यार्थी दाखल





**गडचिरोली । प्रतिनिधी**

नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात शैक्षणिक उदासीनता मोठ्या प्रमाणात आहे. गरिबी, योग्य मार्गदर्शन न मिळणे आणि दुर्गमता आदी कारणांमुळे विद्यार्थी शैक्षणिक संधींपासून वंचित राहतात. या परिस्थितीत गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी देश-विदेशातील नामांकित विद्यापीठात शिक्षण घ्यावे, त्यासाठी विविध संधी, फेलोशीप बाबत माहीती देवून त्यांना चालना देण्याचा संकल्प गडचिरोलीतील एका प्राध्यापकाने करत आदर्श निर्माण केला आहे. डॉ.पंकज नरुले असे त्यांचे नाव असून शिवाजी महाविद्यालय चामोर्शी येथे प्राध्यापक म्हणून मागील १० वर्षांपासून कार्यरत आहे. शिक्षण विषयक संधींचे विकेंद्रीकरण व्हावे म्हणून त्यांनी संकल्प फाउंडेशनची स्थापना केली. गेल्या ५ वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यात शैक्षणिक कार्यशाळा, निवासी शिबिरे व मार्गदर्शन कार्यक्रमातून शैक्षणिक वातावरण निर्मिती डॉ.पंकज नरूले यांनी केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील विद्यार्थी पुणे, मुंबई, नागपूर, बंगलोर, भोपाळ आदी ठिकाणी असलेल्या अझीम प्रेमजी विद्यापीठ, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, फर्ग्युसन कॉलेज, गरवारे महाविद्यालय, मातृसेवा संघाच्या नामांकित विद्यापीठ व महाविद्यालयात शिकत आहे. डॉ.नरुले यांच्या मार्गदर्शनात मागील वर्षी ११ व यंदा २८ विद्यार्थी देशातील नामांकित विद्यापीठात शिक्षण घेत आहे. शिवाय देशपातळीवर नामांकित असणारी गांधी फेलोशीप दोन विद्यार्थ्यांना तर एसबीआय युथ फेलोशीप एका विद्यार्थ्याला मिळाली असून ते सामाजिक बदलांसाठी जमीनीस्तरावर योगदान देत आहेत. संकल्प फाऊंडेशनच्या माध्यमातून डॉ.पंकज नरुले यांच्यासोबत प्रा.पुनीत मातकर,चेतना लाटकर, डॉ.मेघा सालोरकर, भुपेश फुलझेले, इतिहास मेश्राम, परमेश्वर जोगदंडे,संदीप साबळे कार्यरत असून आदिवासीबहुल भागातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाच्या संधीबाबत मार्गदर्शन करत योगदान देत आहेत.यंदा गडचिरोलीतील ५० हून अधिक विद्यार्थ्यांची केंद्रीय विद्यापीठांच्या तर शेकडो विद्यार्थ्यांची अझीम प्रेमजी विद्यापीठांच्या पूर्वचाचणीची तयारी डॉ.नरुले संकल्प फाऊंडेशनच्या माध्यमातून करत आहेत. देशातील नामांकित संस्थेत शिक्षण घेतलेले अमेरिकेतील टेक्सास विद्यापीठाचे विशाल ठाकरे, आंतरराष्ट्रीय चेव्हनिंग स्कॉलर ड.दीपक चटप, इरास्मूस मुंड्स स्कॉलर ड.बोधी रामटेके, देशातील नामांकित विद्यापीठातून शिक्षण घेतलेले कार्तिक चित्रकार, ममिता मडावी, गणेश पंडित, अमन सिरसाट,सुस्मिता हेपटे, मयूर लुटे आदींचे थेट मार्गदर्शन विद्यार्थ्यांना डॉ.नरुले यांनी उपलब्ध करुन दिले आहे. सामाजिक कार्यकर्ते अविनाश पोईनकर, रवी चुनारकर, अभय पेंदाम, कुणाल नक्षीने यांचेही सहकार्य लाभत आहे. शिक्षकांचे काम हे केवळ पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम शिकविणे इतके मर्यादित नाही. नव्या पिढीतील विद्यार्थी घडविणे, त्यांना योग्य दिशा दाखवून मार्गक्रमण करायला लावणे हे मुख्य कार्य असायला हवे. मार्गदर्शन कार्यशाळेतून विद्यार्थ्यांत उच्च शिक्षणाची प्रेरणा निर्माण होते. त्यानंतर विद्यार्थ्यांशी सातत्याने संपर्कात राहून काम करावे लागते. या संपूर्ण कामात झोकून देत डॉ.नरुले संकल्प संस्थेच्या माध्यमातून स्व:खर्चातून व लोकसहकार्यातून अविरतपणे काम करत असून गडचिरोली जिल्ह्यातील उच्चशिक्षणात त्यांचे योगदान उल्लेखनीय व दखलपात्र ठरत आहे.

**“ गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात पुढे आले पाहिजे. देश-विदेशातील नामांकित विद्यापीठातील शिक्षणातून आदिवासीबहुल भागातील विद्यार्थी देशाच्या धोरणनिर्मीतीत पुढे येतील. यासाठी नामांकित विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, फेलोशीप यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचा 'संकल्प' आहे. ही सामूहिक जबाबदारी असल्याचे मी मानतो.**

**- डॉ.पंकज नरुले**
**अध्यक्ष, संकल्प फाऊंडेशन, गडचिरोली**

# संपादकीय

## बेटांवरील शिक्षण माध्यमाचा वाद

लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशात शिक्षण खात्याच्या सर्व शाळा मल्याळम माध्यमाऐवजी सीबीएसई इंग्रजी माध्यमात रूपांतरित करण्याचा निर्णय प्रशासनाने जाहीर केला आहे. मात्र यामुळे शिक्षण हक्क कायद्याच्या गाभ्याला धक्का बसत असून, स्थानिकांचे मत विचारात न घेताच, इंग्रजी माध्यमाचा निर्णय लादण्यात आल्याचा आरोप होत आहे.

उभ्या आडव्या पसरलेल्या आणि प्रचंड विस्ताराच्या-लोकसंख्येच्या भारतात लक्षद्वीप हा केंद्रशासित प्रदेश आणि अरबी समुद्रातील द्वीपसमूह मुख्य भूमीपासून विलग असल्याने दुर्लक्षित. छत्तीस बेटे मिळून अवघे ३२ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ आणि जेमतेम ६४ हजार लोकसंख्या (२०११च्या जनगणनेनुसार) असलेल्या या बेटांवर सध्या शिक्षणाच्या माध्यमाचा मुद्दा चर्चेत आला आहे. लक्षद्वीप प्रशासनाने या केंद्रशासित प्रदेशाच्या शिक्षण धोरणात मोठा बदल केला असून, शिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या एससीईआरटी केरळ बोर्डाच्या सर्व शाळा मल्याळम माध्यमाऐवजी सीबीएसईच्या इंग्रजी माध्यमात रूपांतरित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.शिक्षण विभागाच्या संचालकांनी नुकताच हा निर्णय जाहीर केला. शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी आणि २१व्या शतकातील कौशल्यांनी विद्यार्थ्यांना सिद्ध करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे जाहीर करण्यात आले आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सीबीएसई इंग्रजी माध्यम सुरू करण्यात येणार आहे. यानुसार, पहिलीचे प्रवेश केवळ इंग्रजी माध्यमासाठी घेतले जातील, दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे माध्यमही पुढील शैक्षणिक वर्षापासूनच मल्याळममधून इंग्रजी केले जाईल, तर नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी पुढील दोन वर्षांत हा बदल अंमलात आणला जाईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार, इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या वर्गांना त्रिभाषा सूत्रानुसार इंग्रजी, मल्याळम आणि हिंदी भाषा शिकवल्या जाणार आहेत.मात्र शिक्षणाच्या माध्यमाचा हा मुद्दा आता वादाचा ठरला आहे. प्रामुख्याने मुस्लीमधर्मीय लोकसंख्या असलेल्या लक्षद्वीपमधील मिनिकॉय बेट वगळता उर्वरित निवासी बेटांवर बोलली जाणारी भाषा ही मल्याळमची अधिकृत बोलीभाषा आहे. ही भाषा तमिळ भाषेशी जवळीक साधणारी आहे. तर मिनिकॉय बेटावर श्रीलंकेतील सिंहला भाषेशी साधर्म्य असलेली महाल भाषा बोलली जाते. सध्या या केंद्रशासित प्रदेशात विद्यार्थ्यांना केरळ बोर्डाच्या मल्याळम तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांसह सीबीएसईच्या इंग्रजी शाळांमध्ये शिक्षण घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे. लक्षद्वीपच्या शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार, या द्वीपसमूहात ५१ शाळांमध्ये आठ हजार २०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, तर एक हजार २१ शिक्षक अध्यापन करत आहेत. यापैकी बहुतांश शाळा सध्या मल्याळम आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण देतात. हा आकडा लहान वाटत असला, तरी सरसकट इंग्रजी माध्यम लादल्याने पालक व विद्यार्थ्यांचा मातृभाषेतून शिक्षणाचा तसेच, निवडीचा हक्क हिरावून घेतल्याचे मत व्यक्त होत आहे. तसेच, सध्या मल्याळम माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अचानक इंग्रजी माध्यमात घातल्यास त्यांनाही अभ्यास जड जाईल, याकडे शिक्षकांनी लक्ष वेधले आहे.इंग्रजी शाळांची सक्ती म्हणजे बेटवासींना केरळपासून तोडण्याचा डाव असल्याची टीका लक्षद्वीपमधील काँग्रेस व राष्ट्रवादीने केली आहे. स्थानिकांनी याची मागणी केली नव्हती, तसेच हा निर्णय घेताना स्थानिकांचे मत विचारात घेतलेले नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.लक्षद्वीपमधील सर्व मल्याळम शाळा सीबीएसई इंग्रजी माध्यमात बदलण्याच्या निर्णयाबद्दल केरळ सरकारने चिंता व्यक्त केली आहे. केरळचे शिक्षण मंत्री व्ही. शिवनकुट्टी यांनी याबाबत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहून या निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे. सरसकट इंग्रजी माध्यम लादल्याने विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेले वैविध्यपूर्ण शैक्षणिक पर्याय संपुष्टात येणार असून हे शिक्षणाच्या मूलभूत हक्काचे उल्लंघन आहे, असे त्यांनी म्हटले आहे. या द्वीपसमूहावरील बहुतांश विद्यार्थी केरळ बोर्डाच्या शाळांमध्ये शिकत आहेत. बालकांच्या शिक्षणात, विशेषतः प्राथमिक शिक्षणात त्यांची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेणे गरजेचे आहे. या मूलभूत तत्त्वांचेच या निर्णयामुळे उल्लंघन होत आहे, असे शिवनकुट्टी यांनी म्हटले आहे. शिक्षण हक्क कायद्याने विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक परिस्थितीशी जुळणारे शिक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित केलेले असताना, एकच अभ्यासक्रम सर्वांवर लादणे म्हणजे या महत्त्वाच्या कायद्याच्या गाभ्याला झिडकारणे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.लक्षद्वीपचा मल्याळम आणि संस्कृतमध्येही अर्थ लाखो बेटे असा होतो. या ३६ बेटांच्या समूहापैकी १० बेटांवर वस्ती आहे. अरबी समुद्रात ७८ हजार चौरस किमी एवढ्या विस्तृत क्षेत्रात एकूण अवघे ३२ चौरस किमी क्षेत्रफळ असलेली ही बेटे विखुरली आहेत आणि कोणत्याही बेटाची रुंदी दोन किमीपेक्षा अधिक नाही. केरळमधील किनाऱ्यावरील कोचीपासून २२० ते ४४० किमी अंतरावर ही बेटे आहेत. लहानशी लोकसंख्या असलेले लक्षद्वीप हे साक्षरतेचा टक्का सर्वाधिक असलेली राज्ये व केंद्रशासित प्रदेशांपैकी आहे. २०११च्या आकडेवारीनुसार, लक्षद्वीपमध्ये साक्षरतेचे प्रमाण ९२ टक्के होते. त्याहून अधिक साक्षरता केवळ केरळ आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये नोंदवण्यात आली आहे. स्वातंत्र्यानंतर शाळांच्या उपलब्धतेमुळे शिक्षणाचे प्रमाण वाढले असून १९५१मध्ये १५.२३ टक्के साक्षरता असलेल्या या राज्यात आता हा टक्का मागील दशकातच नव्वदीपलीकडे गेला आहे. या केंद्रशासित प्रदेशात ५,२०० मॅट्रिक, ३५० हून अधिक पदवीधर, ७० द्विपदवीधर, १२० इंजिनीअर, ९५ डॉक्टर असून अनेक जण विविध क्षेत्रांत उच्च शिक्षण घेत आहेत, याचा लक्षद्वीपच्या शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर अभिमानाने उल्लेख करण्यात आला आहे. तर देशभरात दहावीनंतर विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण २० टक्के असताना, लक्षद्वीपमध्ये ते अवघे ०.२ टक्के आहे.एकीकडे या दुर्गम भागात शिक्षणाच्या क्षेत्रात चांगली कामगिरी नोंदवली जात असताना, लक्षद्वीपमध्ये शाळांचे गणवेश, शालेय आहारातून मांस वगळणे, शाळांची सुट्टी शुक्रवारऐवजी रविवारी ठेवणे आदी निर्णयावरून मागील काही महिन्यांत वाद उद्भवले होते. त्या पार्श्वभूमीवर शिक्षणाचे माध्यम इंग्रजी करण्याच्या निर्णयाकडेही संशयाने पाहिले जात आहे.

# मनुष्य स्वत:लाच बंधक बनवतो!



वय वाढूनही जर उदात्त ध्येय डोळ्यांसमोर ठेवलं तर मनुष्य आठवणींमध्येच न रमता भविष्यावर डोळा ठेवून वर्तमानातही उत्तम जीवन जगू शकतो.मानवी जीवन आशा आणि आठवणी यांमध्ये व्यतीत होत असतं. ऐन तारुण्यात अनेक प्रकारच्या आशा-आकांक्षा जपल्या जातात, मनोराज्यं केली जातात किंवा स्वप्नं रंगवली जातात. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी युवक-युवती कर्मतत्पर होतात; त्यामुळे एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा जीवनाला व्यापून राहते.आशा-आकांक्षा बाळगणं, मनोराज्यं करणं, ध्येय निश्चित करणं आणि त्याच्या साध्यतेची जिद्द बाळगणं हे सळसळत्या तारुण्याचंच लक्षण असतं.याउलट साठी उलटल्यानंतर किंवा निवृत्तीनंतर आशा-आकांक्षांची जागा आठवणी घेतात. मग अशा व्यक्तीला आपला भूतकाळ आठवत राहतो. आपल्यावेळचं जीवन किती चांगलं होतं, ते दिवस आजच्यापेक्षा किती छान होते वगैरे आठवणी मनात कल्लोळ माजवतात.आजचा जमाना पूर्वीसारखा राहिला नाही, पूर्वी असं नव्हतं अशा प्रकारची खंतही दर्शवली जाते किंवा मनात बाळगली जाते. ऐन तारुण्यातल्या आठवणीसुद्धा मनात उफाळून येतात. शिक्षण, विवाह, संसार, मौजमजा, सणवार, सहली इत्यादी अनेक आठवणी मनात काही क्षण सुखाची भावना निर्माण करतात.परंतु त्याचबरोबर आपल्या हातून तो काळ निसटून गेल्याची खंतही मनाला लागून राहते. त्यामुळे जीवनात नैराश्य येऊ लागतं. त्याचा परिणाम मनावर आणि पर्यायानं शरीरावर होतो. नातेसंबंधांमधले ताणतणाव त्यात भर घालतात.थोडक्यात, इंद्रिय-मनाचे भावीकालीन संभाव्य अनुभव म्हणजे आशा, तर इंद्रिय-मनाचे भूतकाळात प्रत्यक्ष घेतलेले अनुभव म्हणजे आठवणी! म्हणजे आशेतही मन असतं आणि आठवणींमागेही मनच असतं!

### अनिश्चितता जीवनाचं सार

अशा तऱ्हेनं मनुष्यजीवन हे आशा आणि आठवणी यांमध्येच व्यतीत होत असतं आणि या साऱ्या जाणिवा मनाशी निगडीत असतात. म्हणजे मनच ऐन तारुण्यातल्या आणि उतारवयातल्या या भावभावना ठरवत असतं.हीच तर खरी माया असते! वास्तविकत: सूक्ष्म गुणसूत्रं एकत्र येऊन एक जीव तयार होतो. स्त्रीच्या उदरात तो अन्नावर पोसला जातो. जन्म होताच तो मातेच्या दुधावर आणि पुढे बाह्य अन्नावर पुष्ट होत जातो. या शरीराला मग मन चिकटतं.सभोवारचे प्रभाव त्या जीवाला या भौतिक सृष्टीत रमवतात. त्यामुळे हे भौतिक जीवनंच खरं आहे, अशी जीवाची समजूत होते. किंबहुना हे शरीर म्हणजे 'मी' आहे, ही भावना त्या जीवामध्ये दृढ होत जाते.मग या जगतातले शारीरिक भोग भोगण्यासाठी मन त्या जीवाला सतत प्रवृत्त करतं. त्यामुळे मोहग्रस्त मन इंद्रियांच्या ताब्यात जातं. पर्यायानं जीवनात भावभावनांचा खेळ सुरू होतो. या खेळात गोष्टी मनासारख्या घडल्या की जीव सुखावतो; घडल्या नाहीत तर दुखावतो.मायिक जगताला स्वत:हून धरून ठेवल्यामुळे जीवनात सुखाचे अनुभव येतात, तसेच दुःखांचेही अनुभव मिळत जातात. हे अनुभव व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक स्वरूपाचे असतात. कालानुरूप त्याची तीव्रताही कमी-जास्त होत असते.तात्पर्य, सुख-दुःखांच्या आणि यशापयशाच्या छायेतच मनुष्यजीवन व्यतीत होत असतं. सुखानं सुखावणं आणि दुःखानं दुखावणं हा मनुष्यस्वभाव बनतो. हा मायिक खेळ संपताना पुन्हा सूक्ष्मतेकडेच जायचं असतं. जीवासाठी ती अपरिहार्यता असते. अनिश्चितता हेच जीवनाचं सार असतं.त्या अनिश्चिततेतच अंतिमतः देहिक मन अंतर्धान पावत असतं. 'मेझ' नावाच्या एका इंग्रजी चित्रपटात अनेक स्तरांवर घडणारा एक खेळ दाखवलेला आहे. मनुष्य एका विशाल पिंजऱ्यात कसा अडकला आहे, याचं थरारक प्रत्ययकारी दर्शन त्यात घडवलं आहे.अशा तऱ्हेचा हा खेळ लक्षावधी वर्षे चालला आहे. या सृष्टीस्वरूपी धर्मशाळेत जीव काही काळासाठी येतो.असंख्य आशा-आकांक्षा बाळगतो, आठवणींचा अनुभव घेतो आणि पुन्हा पुढच्या मुक्कामाला जातो. वय वाढूनही जर उदात्त ध्येय डोळ्यांसमोर ठेवलं तर मनुष्य आठवणींमध्येच न रमता भविष्यावर डोळा ठेवून वर्तमानातही उत्तम जीवन जगू शकतो.

### मायिक गोष्टींची बंधनं

आशा आणि आठवणींमधील जीवन जगत असताना अनेकदा मनुष्यानंच सुख-दुःखांना जवळ केलेलं असतं; अगदी घट्ट पकडून ठेवलेलं असतं! या संदर्भात एक पारंपरिक गोष्ट आहे. एक उंटस्वार प्रवास करत एका मठाजवळ येऊन पोचतो.एव्हाना रात्र झालेली असते. उंट आणि उंटस्वार दोघेही दमलेले असतात. त्यांना विश्रांतीची आवश्यकता असते. उंटस्वार मठामध्ये प्रवेश करतो. मठाधिपती त्याचं यथोचित स्वागत करतो; जेवणाचा आग्रह करतो.त्याचे आभार मानून उंटस्वार म्हणतो, 'आधी मला माझ्या उंटाची सोय लावली पाहिजे. मी वेळेत माझ्या मुक्कामी पोचेन, असं मला वाटलं होतं. पण आता उशीर झाला. उंटाला बांधण्यासाठी माझ्याजवळ दोरीही नाही आणि खुंटीही नाही. उंट अजूनही उभा आहे. बांधल्याशिवाय तो बसणार नाही.'मठाधिपती म्हणतो, 'काही काळजी करू नकोस... तू रोज जसं उंटाला बांधतोस तसंच कर...' 'पण बांधायला दोरी आणि खुंटी कुठे आहे?''नसेना का!' मठाधिपती हसून सांगतो, 'तू बांधण्याच्या साऱ्या क्रिया दोरीशिवाय रोजच्याप्रमाणे कर... बघ काय होतं ते!' उंटस्वार त्याप्रमाणे नुसत्याच क्रिया करतो, अर्थात ग़ळाळपस करतो. लगेच उंट खाली बसतो.उंटस्वाराला आश्चर्य वाटतं. दुसऱ्या दिवशी मठाधिपतीचे आभार मानून तो निघतो आणि उंटापाशी येतो. पण बसलेला उंट खूप प्रयत्न करूनही काही केल्या उठत नाही. तेव्हा उंटस्वार पुन्हा मठाधिपतीकडे येतो आणि उंट जागचा हालत नसल्याचं सांगतो. तेव्हा मठाधिपती म्हणतो, 'अरे, त्याची दोरी सोडलीस का...?' 'बांधलीच नव्हती तर सोडायची कशी?' उंटस्वार संभ्रमित होतो.मठाधिपती हसून म्हणतो, 'आपण बांधले गेलो आहोत अशीच उंटाची समजूत आहे. ती तू दूर कर... म्हणजे खुंटीतून दोरी सोडल्याचं नाटक कर. मग तो उठून उभा राहतो की नाही ते बघ!'उंटस्वार त्याप्रमाणे करतो तेव्हा उंट खरोखरच उठून उभा राहतो आणि निघण्यासाठी तयार होतो. उंटस्वाराला आश्चर्य वाटतं. तेव्हा मठाधिपती सांगतो, 'आपण खरोखरच बांधले गेलो आहोत अशी उंटाची समज होती.तू त्याला सोडण्याचं नाटक केलंस तेव्हा आपला बंध मोकळा झाला, असंही त्याला वाटलं. जे प्रत्यक्षात नव्हतंच त्याला उंटानं मनोमन बांधून घेतलं होतं. मनुष्य असाच मायिक गोष्टींना स्वत:हून बांधून घेत असतो; सुखदुःखांना जवळ करत असतो. वास्तविकतः आपण बंधमुक्तच आहोत. तशी जाणीव होणं हेच खरं ज्ञान असतं.'

### बंधमुक्ततेचा अनुभव

देहिक मनामध्ये उद्भवणाऱ्या आशा-आकांक्षा, अस्मिता-आसक्ती, स्वकर्तृत्वाभिमान आदी भावभावना सरावानं काही काळ दूर करता आल्या तर आपण दैवी जीव असून केवळ मानवी जीवनाचा तात्कालिक अनुभव घेत आहोत हे ज्ञान होतं.फ्रेंच तत्त्वज्ञ पिअरी चार्डिन यांनी म्हटलं आहे, "We are not human beings having a spiritual experience. We are spiritual beings having a human experience.' हे ज्ञान होण्यासाठीच ध्यानधारणा करण्याची आवश्यकता असते. जीवनाचा उद्देश आणि आपलं मूळचं दैवी स्वरूप यांचं ज्ञान होताच मनुष्य या असार जगतातही बंधमुक्तता अनुभवू शकतो.

# तासांच्या प्रश्नावर संकल्पांचे गणित

एक वर्ष सरता तुम्हाला कुणी सांगितले, की रोज तुमच्या खात्यात ८६ हजार ४०० जमा होतील आणि तुम्ही त्याचा विनियोग केला नाही, तर ते परत मिळणार नाहीत, वाया जातील. दुसऱ्या दिवशी परत ८६ हजार ४०० जमा होतील आणि जेवढे सत्कारणी लावले तेवढे ठीक, नाहीतर बाकीचे वाया. आता तुम्ही म्हणाल, की बरे आहे ना काहीही न करता खात्यात इतके पैसे जमा होत आहेत, तर कशाला चिंता. लागले तेवढे वापरू, एक मोठी घसघशीत एस. आय. पी. काढू आणि गुंतवणूक सुरू करू, आरामात जगू. होय ना?असे झाले, तर साऱ्या विवंचना, काळजी क्षणात दूर होतील. होय, असे रोज होतच असते; पण आपण अनभिज्ञ असतो. एव्हाना तुमचा समज झाला असेल, की बँकेच्या खात्यात, बँकेच्या नव्हे रोज आपल्या जीवनाच्या खात्यात दिवसाचे ८६ हजार ४०० सेकंद जमा होत असतात. वेळेचे गणित मांडले, तर रोज आपल्यापाशी २४ तास म्हणजे ८६ हजार ४०० सेकंद असतात. म्हणतात ना, 'टाइम इज मनी.' पैशांपेक्षा, गेलेले- घालवलेले अमूल्य सेकंद, तास, दिवस कधीच परत येत नाहीत. सरणारे वर्ष आपल्या आयुष्यातील तीन कोटी १५ लाख ३६ हजार सेकंद त्याच्याबरोबर घेऊन जाणार आहे. वर्षाचा लेखाजोखा मांडताना, पुढील वर्षी 'मी हे करणार, अमुक झालेच पाहिजे. तमुक मी करीनच,' असा प्रत्येकाचा आत्मसंवाद सुरू असतो; पण त्याची पूर्वतयारी आपण करतो का? विशेषत: स्त्रियांच्या बाबतीत वजन कमी करणे, फिट होणे हे नवीन वर्षाचे संकल्प तर पूर आलेल्या नदीप्रमाणे ओसंडून वाहत असतात. पुढे त्यांचे काय होते हे आपण जाणतोच!नववर्ष संकल्प नेमके काय करावे, कसे करावे, का करावे, याच्या मुळाशी जोवर आपण जात नाही, तोवर ते पूर्ण होण्याची शाश्वती नाही. उदाहरण घ्यायचे झाले, तर वजन कमी करण्याचा संकल्प. वजन कमी करणे म्हणजे १० किलो वजन कमी करणे, असा आपण संकल्प केला, तर किती काळात ते होईल, किती महिने लागतील, रोजच्या जीवनशैलीत काय बदल करावे लागतील, मागे-पुढे झाले तर काय, मध्येच किंवा आठवड्याभरातच उत्साहाला ओहटी लागली तर काय? आपला संकल्प तडीस नेण्यास छोटे-छोटे रोज करावयाचे नियोजन आपण केले आहे का? आपल्या संकल्पाबाबत आपण दुसऱ्या कोणाशी बोललो आहोत का? त्या व्यक्तीची मदत आपल्याला लागणार आहे का? आपल्यासारखाच संकल्प केलेली एखादी व्यक्ती जिच्या/ ज्याच्याबरोबर आपण आपला प्रवास, संकल्प पूर्ण करण्याच्या हेतूने करू शकतो का? एकमेकांना साथ देत, चर्चा करत, एक मागे पडला तर दुसरा त्याला / तिला मदतीचा हात देत पुढे नेऊ शकतो, यावर आपण फारसा विचार करत नाही.संकल्प पूर्ण न होण्यामागे काही महत्त्वाची कारणे असतात, असे मानसशास्त्रातील संशोधन सांगते. सर्वांत पहिले कारण म्हणजे तो संकल्प किंवा संकल्प स्वत:च्या जीवन ध्येयाशी सुसंगत नसणे. तो संकल्प करावा असे दुसऱ्या व्यक्तीचे सांगणे असेल, दुसरी व्यक्ती ते करण्यास तुम्हाला भाग पाडत असेल, तर तो संकल्प अल्पावधीत मागे पडतो. दुसरे, ते केले नाही, तर तुम्हाला स्वत:ला स्वत:बद्दल कमीपणाची भावना निर्माण होते, अपराधीभाव येतो, प्रसंगी लाज वाटते. याउलट संकल्प आपल्या ध्येयाशी सुसंगत असेल, तर तो पूर्ण होण्याची शक्यता बळावते. उदाहरणार्थ, डॉक्टरांनी सांगितले म्हणून वजन कमी करण्यापेक्षा स्वत:ला मनोमन पटले असेल, तर तो संकल्प पूर्ण होण्याची शक्यता वाढते. संकल्प केला आणि झाला, असे होत नाही.एक जानेवारीपासून मी हे, हे, हे करणार किंवा करणार नाही, याची एक लांबलचक यादी आपल्या मनात तयार होत असते. ३१ डिसेंबरपर्यंत हे, हे, हे केले; पण आता अजिबात नाही, अशी महत्त्वाकांक्षी अन् तितकीच फोल अपेक्षा स्वत:कडून आपण करत असू, तर तो निश्चितच अपयशाचा मार्ग असेल. 'नवीन वर्षाचे संकल्प' अशी आपली यादी मोठी असेल, तर ती पूर्ण होणार की नाही, हा प्रश्न आपण स्वत:ला विचारावा. त्यापेक्षा वास्तववादी भूमिका घ्यायला हवी. ही दोन ध्येये मी साध्य करणारच. ही दोन ध्येये इथपर्यंत झाली तरी ठीक! पण ती साध्य होत नाहीत असे वाटले, तर आढावा घेऊन सुधारणा करीन, असा विचार आधी करायला हवा. ध्येय साध्य करण्यास सर्वांत आधी आपल्यातला बदल करावा लागतो; कारण आतापर्यंत, कालपर्यंत जे आपण करत होतो, त्यापेक्षा वेगळे केले, वर्तनात बदल केले तर ते ध्येय, तो संकल्प साध्य होणार आहे. यासाठी वर्तनात छोटे-छोटे बदल करणे गरजेचे असते. नव वर्ष संकल्प यादी बनवणे काही मिनिटांचे काम; पण ती प्रत्यक्षात आणणे म्हणजे एव्हरेस्ट शिखर चढण्याप्रमाणे एकेक पाऊल सावकाश, विचारपूर्वक पुढे टाकणे.'दिवस कधी उगवतो आणि कधी मावळतो, कळतही नाही, एक मिनिट वेळ नसतो, मग कुठून काढायचा वेळ 'अमुक-तमुक' करायला.' असे संवाद आपल्या कानावर पडत असतात. आपणही या संवादांचा भाग असतो. वेळ म्हणजे दिवसाचे ८६ हजार ४०० सेकंद. ते सर्वांना सारखे मिळतात. कमी-अधिक नाही; पण काही दिवसाचे सु-नियोजन तर काही न-नियोजन करतात. आला दिवस-गेला दिवस किंवा खूप वरवरच्या गोष्टी करत, प्रचंड व्यग्र राहत, काहींचे दिवस, महिने, वर्षे निघून जातात आणि मग एक दिवस 'ते तर केलेच नाही, हे तर राहूनच गेले,' असे उसासे सोडत राहतात. नववर्षात आपलेही तसे होऊ नये असे वाटत असेल, तर सर्वप्रथम वेळेचे, दिवसाचे नियोजन करावे लागेल.आदल्या दिवशी झोपण्याआधी दुसऱ्या दिवशी काय करायचे आहे, महत्त्वाची कामे, काही पूर्वनियोजित कार्यक्रम/ मीटिंग इत्यादी आहे का, आपल्या नववर्ष संकल्पाशी निगडित कुठली ॲक्टिव्हिटी आहे, त्यासाठी दिवसाचा कुठला वेळ आपण राखून ठेवला आहे, काही पूर्वतयारी करावी लागणार आहे का? त्या वेळेत दुसरे काही उद्या अचानक आले, तर काय असा सारा विचार आणि नियोजन आपण आदल्या दिवशी केले, तर दुसरा दिवस सुरू झाल्या क्षणापासून बराचसा आपल्या नियंत्रणात असतो. शेवटी वर्ष म्हणजे काय, तर ३६५ दिवस, २४ तास म्हणजे एक दिवस आणि एक दिवस म्हणजे ८६ हजार ४०० सेकंद. आपल्या जीवनाच्या खात्यात रोज, अगदी रोज, वर्षानुवर्ष येणाऱ्या या तासांचे, सेकंदांचे नियोजन आपण करू लागलो, तर केवळ नववर्ष संकल्प नव्हेच, तर जीवनध्येयही साध्य होतील.



## संघर्षनायक केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा वाढदिवस

# रिपब्लिकन पक्षातर्फे संघर्ष दिन म्हणून देशभर साजरा होणार

**मुंबई । हेमंत रणपिसे**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले हे देशभरातील बहुजनांचे संघर्षनायक, लोकनेते म्हणून लोकप्रिय आहेत. संघर्षनायक ना. रामदास आठवले यांचा २५ डिसेंबर हा वाढदिवस रिपब्लिकन पक्षाच्यावतीने दरवर्षी देशभर संघर्षदिन म्हणून साजरा केला जातो. येत्या २५ डिसेंबर २०२३ रोजी केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून देशभर साजरा करण्यात येणार आहे. रिपब्लिकन पक्षाच्यावतीने देशभरात सर्व राज्यात ना.रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमीत्त गरिबांना मोफत अन्न, वस्त्र, शाल;चादर ;वही पेन शैक्षणिक साहित्य वैद्यकीय मदत महिलांना साडी वाटप केले जाणार आहे. तसेच देशभर विविध सामाजिक उपक्रम राबवुन ना.रामदास आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन साजरा करण्यात येणार आहे. संघर्षनायक केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून साजरा करतांना मुंबईसह सूंपर्ण महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशात विविध जिल्हयांमध्ये रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या वतीने अनेक रुग्णालयांमध्ये रुग्णांना मोफत फळे बिस्कीट वाटप करण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी रक्तदान शिबीरे ;आरोग्य तपासणी शिबीर; चष्मा वाटप; दन्त चिकित्सा शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी रक्तदान शिबीर, विविध रुग्णालयांमध्ये फळ वाटप करण्यात येणार आहेत. तसेच अनेक बुध्द विहारांमध्ये लाडुंचे



वाटप करण्यात येणार आहे. तसेच अनेक गरिबांना थंडीपासून वाचण्यासाठी चादर, ब्लँकेटचे वाटप करण्यात येणार आहे. गोरगरिब विद्यार्थ्यांना एक वही एक पेन सुध्दा वाटप करुन संघर्षनायक ना. रामदास आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या राजकीय वाटचालीमध्ये अत्यंत कठीण संघर्ष केला आहे. संघर्षाचे दुसरे नांव म्हणजे रामदास आठवले आहे. त्यामुळे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना संघर्षनायक नेते म्हणून गौरविले जाते. संघर्षनायक ना.रामदास आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देशभर साजरा केला जातो. संघर्षदिनानिमीत्त रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या वतीने विविध ठिकाणी समाजपयोगी उपक्रम राबवुन संघर्षदिन म्हणून ना.रामदास आठवले यांचा वाढदिवस साजरा केला जातो. घाटकोपर भिमनगर येथे नुकताच रिपाइंचे प्रसिध्दीप्रमुख हेमंत रणपिसे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी रिपाइंचे प्रसिध्दी प्रमुख हेमंत रणपिसे यांनी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले. यावेळी रिपाइंचे मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड, अरुण पाठारे, विजय साबळे, घाटकोपर तालुका अध्यक्ष अनिल जाधव, संदेश हाटे नैनाताई वैराट आदि अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पौष्टिक तृणधान्याचा आहारात समावेश आवश्यक- जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे

**परभणी । प्रतिनिधी**

आपल्या आरोग्य चांगले राहावे यासाठी प्रत्येकाने आहार विहाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यातच आपल्या दैनंदिन आयुष्यात आहारामध्ये पौष्टिक तृणधान्याचा समावेश करणे ही काळाची गरज असून प्रत्येकाने कृतीत आणायला पाहिजे असे प्रतिपादन जिल्ह्याधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले.



महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य २०२३ अंतर्गत जिल्हास्तरीय कृषि महोत्सवाचे आयोजन कृषी माहिती तंत्रज्ञान वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे (दी.२० )डिसेंबर रोजी करण्यात आले होते. महोत्सवाच्या अध्यक्ष तथा उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवि हारणे,प्रकल्प संचालक आत्माचे दौलत चव्हाण, वसंतराव नाईक मराठा कृषी विद्यापीठ मधील कृषी विद्यावेता डॉ.गजानन गडदे, डॉ. मधुमती कुलकर्णी, कृषि संचालक डॉ. धर्मराज गोखले आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे म्हणाले की आहारात तृणधान्य अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे आयोजित केलेला पौष्टिक तृणधान्य उपक्रम स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर डॉ.गडदे, डॉ. गोखले यांनी पौष्टिक तृणधान्य बाबतीत सखोल मार्गदर्शन केले. डॉ. मधुमती कुलकर्णी यांनी आपल्या आहारातील तृणधान्याच्या अभावामुळे होणारे परिणाम आणि त्यावरील उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पौष्टिक तृणधान्य कृषी महोत्सवाची जनजागृती करण्यासाठी राजगोपालचारी उद्यान ते कृषी माहिती तंत्रज्ञान वसंतराव नाईक मराठा कृषी विद्यापीठ पर्यंत प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीस अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. प्रभात फेरीमध्येकृषि विभागांतील, कृषि उपसंचालक महादेव लोंढे तालुका कृषि अधिकारी,गणेश कोरेवाड , प्रभाकर बनसावडे , नित्यानंद काळे -सह , सर्व आधिकरी- कर्मचारी, गांधी विद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,आदि सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या हातात पौष्टिक तृणधान्याचे बोधवाक्य लिहिलेले फलक घेऊन लेझीम वाद्यासह विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. कृषि महोत्सवात घेण्यात आलेल्या पाक कला स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच या कृषि महोत्सवात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विविध धान्याचे तसेच अनेक प्रकारचे बनवलेले खाद्यपदार्थ स्टॉलमध्ये मांडले होते. या मांडण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या खाद्यपदार्थ आणि धान्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महोत्सवाच्या कार्यक्रमा मागील भूमिका प्रास्ताविकातुन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवी हारणे यांनी केली. सूत्रसंचालन आबासाहेब देशमुख यांनी केले. कृषि महोत्सव यशस्वी करण्यासाठी कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# केदारांची आमदारकी कायद्याप्रमाणे रद्द; ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठ्यांना आरक्षण देणार–फडणवीस

**मुंबई**–मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकार गंभीर असून ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता मराठ्यांना आरक्षण देणार असल्याचा पुनरुच्चार राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. तसेच राम मंदिराच्या निर्मितीने देशात नवा अध्याय सुरु होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. तर काँग्रेस आमदार सुनील केदार यांची आमदारकी ही कायद्याप्रमाणे रद्द केल्याचेही त्यांनी म्हटले आहे.दरम्यान, देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही पूर्ण शक्तीने हे सगळं काम करत आहोत, कुठेही ओबीसी समाजाला त्रास होणार नाही, ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, याची संपूर्ण काळजी घेत मराठा समाजाच्या आरक्षणावर अत्यंत सकारात्मक कार्यवाही हे राज्य सरकारच्या वतीने सुरू आहे. इंडिया अलायन्स किंवा इंडिया आघाडी ही कुठलीही आघाडी नाही, ज्या लोकांना असे वाटते की मोदीजींमुळे त्यांच्या भ्रष्टाचाराचे दुकान आणि त्यांच्या परिवारवादाचे दुकान बंद होणार आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संजय राऊत रोज वेगवेगळे आरोप करतात. त्यांच्या आरोपांना उत्तर देणे मी आता बंद केले आहे. त्यांच्या आरोपांना देण्याइतकी माझी पातळी खाली गेलेली नाही, असा पलटवार फडणवीस यांनी केला आहे. सलीम कुत्ता सोबतची पार्टी भाजपच्या पदाधिकाऱ्याने आयोजित केली होती. व्यंकटेश मोरे असे त्याचे नाव आहे. आजही मोरे हा भाजपचा पदाधिकारी आहे. आता चौकशी करा, असे म्हणत राऊत यांनी व्यंकटेश मोरेचे उपमुख्यमंत्री फडणवीसांसोबतचे फोटोही दाखवले होते. यावर फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मकतेने काम करत आहे. सरकारची ही सकारात्मकता लक्षात घेता मनोज जरांगे यांनी उपोषणाचे निर्णय घेऊ नये असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. तसेच ओबीसी समाजावर अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा पुनरुच्चारही देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मकतेने काम करत आहे. मुख्यमंत्री शिंदे स्वतः याप्रकरणी जातीने लक्ष देत आहेत. राज्य मागासवर्गीय आयोगाने वेगाने काम सुरु केले. तर शिंदे समितीचा दुसरा अहवाल आला असून तिसरा अहवालही येणे अपेक्षित आहे. त्यामुळे राज्य सरकारची सकारात्मकता पाहता जरांगे यांनीही असा निर्णय घेऊ नये.

## केंद्रीय निवडणूक आयोगाची स्वायतत्ता संपुष्टात आली

# यापुढे निवडणूक आयोग केंद्र सरकारचा गुलाम होणार - प्रकाश आंबेडकर

**अकोला**–केंद्र सरकारने संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटी मंजूर केलेल्या एका विधेयकाने केंद्रीय निवडणूक आयोगाची स्वायतत्ता संपुष्टात आली आहे. त्यामुळे यापुढे निवडणूक आयोग केंद्र सरकारचा गुलाम होणार असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या निवडप्रक्रियेतून सरन्यायाधीशांना वगळून त्यांना पूर्णतः सरकारच्या नियंत्रणात आणणारे वादग्रस्त मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त विधेयक सरकारने गुरुवारी लोकसभेत मंजूर केले आहे. याबाबत बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले, निवडणूक आयुक्त निवडीचे अधिकार सरकारला मिळाले आहे. त्यांचे वेतन, भत्ते आणि निवृत्तीवेतन ठरवण्याचा अधिकार केंद्र सरकारला असेल. यापूर्वी आयोग याबाबतीत स्वायत्त होता, मात्र आता



ती स्वायतत्ता राहिलेली नाही.तुम्हाला संधी दिली होती पुन्हा रडत येऊ नका.. पुन्हा रडत आलात तर ठोकून काढू.! असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी इंडिया आघाडीला दिला आहे. आम्ही लढलो आणि अशोक चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह १५-२० आमदार २५-३० खासदार घरी बसले तर आमच्याकडे रडत यायचे नाही, असे त्यांनी म्हटले आहे.सुजात आंबेडकर म्हणाले की,आम्ही तर वंचित आहोत. आम्ही वंचितांचा लढा उभारत आहोत. आम्ही आणखी एक टर्म सत्तेबाहेर राहिलो तर आम्हाला काही फरक पडणार नाही. तुमच्या संस्था, सहकारी संस्था, नातेवाईक टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही पक्ष बदलत आहात, अशी टीका त्यांनी केली. दोन टर्म सत्ता गेल्यानंतर तुमच्या पक्षाची अवस्था दिसून आली आहे. आम्ही सत्तेत जाण्यासाठी आसूसलेलो नाहीत. आम्ही लढणे सोडणार नाहीत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी यांना वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पत्र लिहून प्रस्ताव पाठवला आहे. त्यावर अजूनही काँग्रेसने अजूनही निर्णय घेतला नाही. सुजात आंबेडकर यांनी कंधार-लोहा विधान सभा मतदारसंघात निर्धार मेळावा घेतला यावेळी बोलताना त्यांनी हा इंडिया आघाडीला इशारा दिला आहे.

# ..तर ५०० खासदारांचा कार्यक्रमच आटोपला असता:संसदेतील घुसखोरी प्रकरणी सुळे यांचा जोरदार हल्लाबोल

**पुणे**–संसदेवर जो घुसखोरीने हल्ला झाला, त्या हल्लेखोरांकडे जर स्फोटके असती, जो तो धूर त्यांनी सोडला तो वेगळ्या विषाक्त असता अथवा हा आत्मघातकी हल्ला असतात तर ५०० खासदारांचा कार्यक्रमच आटोपला असता, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. तर सध्याच्या सरकारच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याची नाराजी सुळे यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान खासदार सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, संसदेवर जो घुसखोरीने हल्ला झाला, त्या हल्लेखोरांकडे जर स्फोटके असती, जो तो धूर त्यांनी सोडला तो वेगळ्या विषाक्त असता अथवा हा आत्मघातकी हल्ला असतात तर ५०० खासदारांचा कार्यक्रमच आटोपला असता. या प्रकारानंतर अद्यापही केंद्र सरकार याबत गंभीर नाही, असेच दिसत आहे. संसद भवन देशातील सर्वांत महत्त्वाची इमारत आहे. या ठिकाणी पंतप्रधानांपासून देशातील सर्वांत महत्त्वाच्या पदांवर काम करणारे लोक असतात. या ठिकाणी अशा प्रकारचा हल्ला होणे हे चिंताजनक आहे. त्यामुळे देशभरातील कायदा आणि सुसंस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, नुकताच जम्मू आणि काश्मिरमध्ये देखील जवानांवर हल्ला झाला. अशा प्रकारचे हल्ले होत असताना सरकार मात्र महागाई बेरोजगारीबाबत लोकसभेत आवाज उठविणाऱ्या खासदारांचे निलंबन करहत आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली. संसदेचे हिवाळी अधिवेश सुरू असताना दिल्लीत काही युवकांनी घुसखोरी केली होती. यातील दोन जणांनी लोकसभेतील गॅलरीतून सभागृहात उड्या मारल्या होत्या. त्यातील एकाने बुटातून धुराची नळकांडीही फोडली होती. खासदारांनी या घुसखोरांना पकडत सुरक्षा रक्षकांच्या ताब्यात दिले होते. पुणे दौऱ्यादरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी सुळे म्हणाल्या, संसदेमध्ये ज्या दिवशी घुसखोरी झाली, त्या दिवशी पुणे जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन खासदार तेथे उपस्थित होते. मात्र याबद्दल आता कोणीही प्रश्न विचारत नसून सगळ्यांना या हल्ल्याचा विसर पडला आहे का?, असा सवाल त्यांनी यावेळी बोलताना उपस्थित केला आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, संसदेच्या परिसरातही काही तरुणांनी याच वेळी निदर्शने केली.



याप्रकरणातील जवळपास सर्वच आरोपींना आता पोलिसांनी अटक केली आहे. घुसखोरी करणाऱ्यांजवळ असलेले पुरावे त्यांच्या एका साथीदाराने नष्ट केले आहे. या घटनेनंतर संसद भवनाच्या सुरक्षेची जबाबदारी आता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडे सोपविण्यात आली आहे. घुसखोरी प्रकरणावरून विरोधी पक्षांनी सरकारला लक्ष्य केले आहे. जे सरकार संसदेची सुरक्षा करू शकत नाही, ते देशाच्या सुरक्षेची जबाबदारी कशी सांभाळणार अशी चौफेर टीका सरकारवर होत आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही सरकारवर टीका केली आहे.

# सरकारची सकारात्मकता पाहता जरांगेंनी असा निर्णय घेऊ नये:अशा प्रकारे उपोषणाचा निर्णय अयोग्य, फडणवीसांचे जरांगेंना आवाहन

**मुंबई**–मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मकतेने काम करत आहे. सरकारची ही सकारात्मकता लक्षात घेता मनोज जरांगे यांनी उपोषणाचे निर्णय घेऊ नये असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. तसेच ओबीसी समाजावर अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा पुनरुच्चारही देवेंद्र फडणवीस यांनी केला.पुढे फडणवीस म्हणाले की, ''मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मकतेने काम करत आहे. मुख्यमंत्री शिंदे स्वतः याप्रकरणी जातीने लक्ष देत आहेत. राज्य मागासवर्गीय आयोगाने वेगाने काम सुरु केले. तर शिंदे समितीचा दुसरा अहवाल आला असून तिसरा अहवालही येणे अपेक्षित आहे. त्यामुळे राज्य सरकारची सकारात्मकता पाहता जरांगे यांनीही असा निर्णय घेऊ नये'', असे फडणवीस म्हणाले.तसेच ओबीसी समाजावर अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काम सुरू आहे. यासाठी फेब्रुवारीमध्ये विशेष अधिवेश बोलावण्यात आले असून यामध्ये तोडगा काढणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच सांगितले. याप्रकरणी डेडलाइननुसार काम सुरू आहे. त्यामुळे अशा प्रकारे उपोषण करणे योग्य नाही असे भाष्य फडणवीस यांनी केले आहे.तर ''संजय राऊत रोज वेगवेगळे आरोप करतात. त्यांच्या आरोपांना उत्तर देणे मी आता बंद केले आहे. त्यांच्या आरोपांना देण्याइतकी माझी पातळी खाली गेलेली नाही'', असा पलटवार फडणवीस यांनी केला आहे. सलीम कुत्ता सोबतची पार्टी भाजपच्या पदाधिकाऱ्याने आयोजित केली होती. व्यंकटेश मोरे असे त्याचे नाव आहे. आजही मोरे हा भाजपचा पदाधिकारी आहे. आता चौकशी करा'' असे म्हणत




राऊत यांनी व्यंकटेश मोरेचे उपमुख्यमंत्री फडणवीसांसोबतचे फोटोही दाखवले होते. यावर फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.तर ''इंडिया आघाडी ज्या प्रकारचे राजकारण करत आहे ते कमकुवत आहे. इंडिया आघडी ही आघडी नाही. मोदींमुळे आपले भ्रष्टाराचे दुकान बंद होईल अशी ज्यांना भीती वाटते ते लोक या आघडीत एकत्र आले आहेत. स्वार्थासाठी एकत्र आलेले लोक स्वार्थासाठीच वेगळेही होतात'' अशी टीका फडणवीस यांनी केली आहे.अयोध्येत २२ जानेवारी रोजी होणाऱ्या सोहळ्याबाबत बोलतांना फडणवीस म्हणाले, ''राम लल्लाची प्राणप्रतिष्ठा झाल्यामुळे एका नवीन अध्यायाची सुरुवात होईल. २२ जानेवारीनंतर एक आत्मनिर्भर, स्वाभिमानी भारत पाहायला मिळेल'' असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

# फौजदारी न्यायालयीन ऐतिहासिक बदलामुळे सर्व नागरिकांना कमी वेळेत न्याय मिळेल- प्रवीण दीक्षित माजी महासंचालक

**मुंबई । प्रतिनिधी**

देशातील फौजदारी कायद्याच्या प्रणालीत केंद्राने अमुलाग्र बदल करून होणारे तीन महत्त्वाचे कायदे भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३,व भारतीय साक्ष संहिता २०२३. नुकतेच संसदेत मंजूर झाले. त्यामुळे दीडशे वर्षा पूर्वीच्या जुन्या फौजदारी न्यायव्यवस्थेवर निमंत्रण ठेवणाऱ्या कायद्याचे प्रथमच बदल केल्यामुळे या फौजदारी न्यायालय ऐतिहासिक बदलामुळे सर्व भारतीय नागरिकांना कमी वेळेत न्याय मिळेल. अशी माहिती सह्याद्री वाहिनीवर माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी दिली.

१८६० च्या दंड संहितेचा इंडियन पिनल कोड या ऐवजी आता भारतीय न्याय संहिता २०२३ केंद्राने अमलात आणल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत केले. भारतीय न्यायव्यवस्थेत बलात्कार, सामूहिक बलात्कार,मुलानेच विरोधातील गुन्हे, हत्या करणे, अपहरन करणे अशा गुन्ह्याचा अधिक गांभीर्याने विचार करण्यात आला. राज द्रोहाचे कलम हटविण्यात आले ,तर देश द्रोहासाठी नवी तरतूद करण्यात आली. १८ वर्षाखालील महिलेवर बलात्कार केला तर जन्मठेप किंवा फाशीची शिक्षेची तरतूद करण्यात आली. तर सामूहिक बलात्कार या गुन्ह्यात मृत्यूपर्यंत करावासाची शिक्षा.एखाद्या गुन्ह्यातील गुन्हेगार हजर नसल्यास आरोपीला शिक्षा होऊन त्याची मालमत्ता जप्त करण्यात येणार अशा या तिन्ही कायद्यात बदल करण्यात आलेत. व या काय तरतुदी व त्याची वैशिष्ट्ये काय आहेत व त्याचा परिणाम न्यायप्रणालीत काय होईल हे सांगताना माझी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी फौजदारी न्यायव्यवस्थेचा परिचय करून देताना म्हणाले की वैयक्तिक कायद्यासाठी दिवाणी कायदे असतात व ज्या फौजदारी कारवाया असतात त्यामध्ये प्रामुख्याने तीन कायदे असतात. हे तीनही कायदे रद्द होऊन आता त्यात बदल करण्यात आले. १) भारतीय न्याय संहिता २) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता ३) भारतीय साक्ष संहिता. भारतीय न्याय संविधानात पूर्वी ५११ कलम होती .ती आता कमी करून ३५८ कलम केलेत व जवळ-जवळ १७५ कलमात बदल केलेत. यात २० नवीन गुन्ह्याची तरतूद केली. ९ कलम वाढवली. ३० गुन्ह्यात कमीत कमी शिक्षा ठेवली. व यात २२ कलम रद्द करण्यात आलेत. दुसरा कायदा भारतीय नागरिक सुरक्षा संरक्षण संहिता. यात पूर्वी ४८४ कलम होती तर आता त्यात वाढ करून ५३१ कलम जोडली. १७७ कलमात बदल करून ९ कलम वाढवण्यात आलेत व १४ कलम रद्द करण्यात आली. तिसरा जो महत्त्वाचा कायदा आहे तो म्हणजे भारतीय साक्ष संहिता. यात १६७ कलम होती तर आता १७० कलम झाली आहेत. यातील २४ कलमात बदल करण्यात आलेत. २ कलम वाढवण्यात आलेत व सहा कलम रद्द करण्यात आली. असे हे महत्त्वाचे बदल फौजदारी कायद्यातील आहेत. ब्रिटिश कालीन न्यायव्यवस्थेपेक्षा हे नवे




कायदे कसे आहेत हे सांगताना प्रवीण दीक्षित म्हणाले इंग्रजांनी इंग्रजाचे राज्य कायम राहावं या उद्देशाने १८५७ मध्ये कायदे तयार केलेत. हे कायदे त्यांनी त्यावेळेस केलेत त्यात काही बदल करून १८५७,१८६०,१८७२,१८९८ मध्ये वेगवेगळ्या वेळेस तयार केलेत. व ती लागू केली. त्यांचा उद्देश गुलामगिरी कायम ठेवण्याचा होता.व त्या दृष्टीने त्यांनी प्राधान्य देऊन ही कलमे अस्तित्वात आणली होती. इंग्लंडच्या राणी विरूद्ध कोणी देशद्रोह करू नये म्हणून देशद्रोहाचा कायदा होता . आता या नवीन तीन कायद्यामुळे लोकांना न्याय कसा मिळेल याकडे मोदी सरकारने विशेष लक्ष दिले. भारतासमोर दहशतवाद व गुन्हेगारी मोठे आव्हान असून यांचे विरुद्ध कठोर कारवाई कशी करता येईल याकडे प्राधान्याने लक्ष दिले आहे. सगळ्यात प्राधान्याने महिलांविरुद्धच्या गुन्ह्याला प्राधान्य देऊन महिला सुरक्षित राहण्याकडे लक्ष दिले. मातृ शक्तीचा सन्मान वाढला पाहिजे हे मोदी सरकारने बघितले .हे या नवीन कायद्याचे उद्दिष्ट आहे. १५० वर्षा तील त्रुटी नाहीसा केल्या. गुन्हेगार एखादा गुन्हा करून पळून गेला तरी तो न्यायालयात हजर नसतानाही न्यायालयाची प्रक्रिया पूर्ण करता येईल. उपस्थित पुराव्यानंतर तो दोशी आढळल्यास त्यास शिक्षा होईल व त्यास या शीक्षे विरोधात अपील करावयाचे असल्यास अपीलास त्यास समक्ष हजार राहावे लागेल. असे नवीन कायद्यात तरतूद आहे .यात आर्थिक गुन्ह्याचा पण समावेश आहे प्रामुख्याने दहशतवादाची व्याख्या केली. ते स्पष्ट करताना भारताने भारताचे सार्वभौमत्व, त्याची एकात्मता, भारताची सुरक्षा, आर्थिक सुरक्षा, भारताची अखंडता या कोणत्याही गोष्टीविरुद्ध कोणी वर्तन करत असेल तर त्या व्यक्तीविरुद्ध कठोर शिक्षेची तरतूद या नवीन संविधानात केलेली आहे. मागील कायद्यामुळे न्यायव्यवस्थेवर खूप परिणाम झाला होता. त्यात निकाल कित्येक वर्षे लागत नव्हते. तारीख पे तारीख असे होत होते .पोलीस कधी गुन्हा दाखल करतील , त्याचा तपास कधी हे समजत नव्हते याला कोणतीही कालमर्यादा नव्हती . भारताचा स्व आत्मा पुन्हा तेवत ठेवने हा उद्देश या नवीन कायद्याचा आहे. शहरात महिलांच्या गळ्यातील चेन हिस्कवने, मोबाईल पळवणे या गुन्ह्याकडे विशेष लक्ष दिले जात नव्हते. आता या गुन्ह्याला तीन वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. एखाद्या व्यक्तीने खोट्या नावाने लग्नाचे आमिष दाखवून शरीर संबंध ठेवले असतील तर त्या व्यक्तीला कठोर शिक्षा ठेवलेली आहे .असे आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. मात्र या बदल केलेल्या कायद्याचे प्रशिक्षण देणे पण आवश्यक आहे. त्याचबरोबर पोलीस व न्यायाधीशांची संख्या वाढवणे तितकेच जरुरी आहे. असे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी सह्याद्री वाहिनीवर दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

## थायलंडमधील दीक्षा समारंभास हत्तीअंबीरे यांची हजेरी

### १०० श्रामणेर भिक्खू संघाचा भव्य दीक्षा समारंभ भारतीय राजदूत नरेश सिंह यांची विशेष उपस्थिती



**परभणी । प्रतिनिधी**

थायलंड या देशातील बँकॉक येथील भव्य बौद्ध विहारात आयोजित केलेल्या १०० श्रामणेर भिक्खू संघाच्या भव्य दीक्षा समारंभास थायलंड येथील भारतीय राजदूत नरेश सिंह यांच्यासह आयोजक सिने अभिनेते गगन मलिक, डॉ.सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांची उपस्थिती होती.भारतातून थायलंड देशात पहिल्यादांच हा समारंभ आयोजित केला असून थाई भिक्खू संघाच्या व मान्यवरांच्या उपस्थित हा ऐतीहासिक समारंभ गुरुवार २१ डिसेंबर रोजी पार पडला.थायलंड येथे आयुथया ते नाखून सावन पर्यंत आयोजित केलेल्या धम्मयात्रेत ४७ भिक्खू व ३३ उपासकांचा सहभाग असून एक महिनाभर श्रामणेर भिक्खू यांना धम्मदीक्षा देण्यात येणार आहे. हा समारंभ थायलंड येथील फ्रास धिरनामुनी आणि थाई भिक्खू संघाच्या मार्गदर्शनाखाली व वेट थोंग रॉयल बुद्ध विहार, फ्रा राजवरोयनानसोफेन, फ्रा ब्रम्हावाजिराकोर्न, फ्रा धम्मसाक्यावोंगविसुधी इत्यादी प्रमुख भिक्खू संघाच्या उपस्थितीत पार पडला.

## राज्यातील घटनात्मक पेच प्रसंग पाहता विधानसभा बरखास्त करावी आणि माझ्या मुलाला श्रीकांत ला मुख्यमंत्री करा-विष्णू गदळे

**बीड:** महाराष्ट्र राज्यातील घटनात्मक पेच पर्सन पाहता विधानसभा बरखास्त करावी असे श्री.विष्णू कुंडलिक गदळे रा.दहिफळ (वड) ता.केज जिल्हा बीड येथील रहिवासी असून. माझा मुलगा श्रीकांत गदळे (किसान पुत्र) गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील विविध प्रश्नावर



सातत्याने निस्वार्थपणे काम करत आहे. त्यामध्ये गरीबी हटाव व शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट्र व्हावे हा संकल्प हाती घेऊ राज्यातील जनतेच्या भल्यासाठी सातत्याने काम करत आहे. आज जर आपण पाहिलं तर माझा मुलगा श्रीकांत गदळे (किसान पुत्र) हा महाराष्ट्र राज्या तील सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या प्रश्नावर सातत्याने काम करत असताना पहावयास मिळतआहे.सध्याची परिस्थिती जर आपण पाहिली तर सरकारमध्ये असलेल्या राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे सर्वसामान्य जनतेचे अनेक प्रश्न प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने राज्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी माझ्या मुलाला श्रीकांतला महाराष्ट्र राज्य चा मुख्यमंत्री पदी नियुक्ती करावी असे राज्यातील २८८ आमदारांपैकी बहुतांशी आमदारांची देखील इच्छा सह सर्वसामान्य जनतेतून सुद्धा मागणी होऊ लागली आहे.सध्याच्या घडीला राज्यात घडणाऱ्या घटना त्यापासून सर्वसामान्यांना होणारा त्रास व घटनात्मक पेच प्रसंग पाहता मा.राज्यपाल महोदय साहेबांनी विधानसभा बरखास्त करून माझ्या मुलाला श्रीकांत गदळे ला महाराष्ट्र राज्यातील गोरगरीब वंचित घटकातील लोकांचे प्रलंबित असलेले प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री या पदावर नियुक्ती देऊन काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी विष्णू गदळे यांनी मा.राज्यपाल महोदय. यांच्याकडे मा.जिल्हाधिकारी साहेब जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्यामार्फत निवेदन देऊन केली आहे.आणि आपण नक्कीच माझ्या मुलाला श्रीकांत ला संधी द्याल ही आशा बाळगतो असे श्री.विष्णू गदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

## सकल ब्राह्मण समाजाकडून झालेल्या कौतुकाने मिळाली प्रचंड उर्जा - एमपीएससी स्टेटटॉपर नरेंद्र जोशी




**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

एमपीएससी परिक्षेत राज्यात प्रथम आलेल्या नरेंद्र मनोहरदेव जोशीचा सकल ब्राह्मण समाजाकडून शानदार व आत्मिय भारावलेल्या वातावरणातील सोहळ्यात ह्रदय सत्कार करण्यात आला. परळीत लहानाचा मोठा झालेला व संघर्षातून यशोशिखर सर केलेल्या परळीच्या या भूमिपुत्राने परळीकरांची प्रशासकीय क्षेत्रात मान उंचावली आहे.तो परळीकरांचा अभिमान बनला असल्याच्या भावना या सोहळ्यात व्यक्त करण्यात आल्या.सकल ब्राह्मण समाजाकडून झालेल्या कौतुकाने आपल्याला प्रचंड उर्जा मिळाली असल्याचे नरेंद्र जोशी यांनी यावेळी सांगितले.ब्राह्मण बहुद्देशीय सभेचे विश्वस्थ वे.शा.सं. मनोहर जोशी यांचे चिरंजीव नरेंद्र मनोहर जोशी यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या ( एमपीएससी) वतीने घेण्यात येणाऱ्या विक्रीकर निरीक्षकांच्या (एसटीआय) परीक्षेत महाराष्ट्र राज्यात प्रथम येण्याचा तसेच दुय्यम निबंधक मुद्रांक निरीक्षक परीक्षेत महाराष्ट्र राज्यात द्वितीय येण्याचा बहुमान पटकावला आहे.यादैदिप्यमान यशाबद्दल सकल ब्राह्मण समाजाकडून आज (रविवार दि. २४ डिसेंबर) स्व.मनोहरपंत बडवे सभागृह विठ्ठल रुक्मिणी मंदिर,देशपांडे गल्ली परळी वैजनाथ येथे चि.नरेंद्र मनोहर जोशी यांचा 'कौतुक सोहळा' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सकल ब्रह्मवृंदांच्या वतीने शाल, श्रीफळ,स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन नरेंद्र जोशी ,त्याचे आई वडील, आजी यांचा सहकुटुंब ह्रदय सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी दीप प्रज्वलन व ब्रह्मवृंदांचे शांतीपठण झाले.तसेच सुवासींनींनी औक्षण केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले. यावेळी बोलतांना मनोहरदेव जोशी यांच्या संघर्षातून व संस्कारातून नरेंद्रने मिळवलेले यश सर्वांसाठी प्रेरक असल्याचे सांगुन भविष्यात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतही नरेंद्रने यश संपादन करावे असे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. यावेळी जेष्ठनेते श्रीकांत मांडे,ब्राह्मण बहुद्देशीय सभेचे सचिव प्रकाश जोशी,कोषाध्यक्ष वासुदेव पाठक, भवानराव देशमुख, प्रा.रविंद्र जोशी, अंबाजोगाईचे रविंद्र पांडे आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र नव्हाडे यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकांत कानेगावकर यांनी केले.या कौतुक सोहळ्यास परळीतील सकल ब्राह्मण समाज बांधव, भगिनी, आप्तेष्ट,स्नेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यू इंग्लिश स्कूल जुनि.कॉलेज सांगोला राष्ट्रीय सेवा योजनेचे कमालापूर येथे उद्घाटन

**सांगोला । प्रतिनिधी**

शिक्षण विभाग पुणे व न्यू इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेज सांगोला राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामपंचायत कमलापूर यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबिर कमलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे.या शिबिराचे उद्घाटन शनिवार दिनांक २३ / १२ /२०२३ रोजी संपन्न झाले .या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून मा .डॉक्टर बाबासाहेब देशमुख हे लाभले तर अध्यक्षस्थानी मा .श्री बाबुराव बंडगर युवा नेते होते .यावेळी संस्था सचिव मा. विठ्ठलराव शिंदे सर संस्था सदस्य प्रा .डॉक्टर अशोकराव शिंदे प्रा . दीपक खटकाळे प्राचार्य मा .श्री हेमंत आदलिंगे प्रा लक्ष्मण राख जिल्हा समन्वय राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले .सुरुवातीला लेझीम नृत्य व स्वागत गीतांनी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर कै आ डॉ गणपतरावजी देशमुख व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.आपल्या मनोगत बोलताना प्रदेशाध्यक्ष माननीय डॉक्टर बाबासाहेब देशमुख असे म्हणाले की,विशेष श्रमसंस्कार शिबिरातून श्रमदान व चांगल्या संस्काराची जडणघडण होईल. जीवनामध्ये संस्काराला फार महत्त्व आहे राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत संस्कारक्षम पिढी घडवण्याचं काम या ठिकाणी केले जात आहे विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी त्याचबरोबर जीवनाला दिशा देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे महत्त्वाचं आहे . विद्यार्थ्यांना त्यांच्या आरोग्याबाबत काळजी घेण्यासाठी सल्ला दिला. याचबरोबर विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा कमीत कमी वापर करावा असे सांगितले.सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला या संस्थेची स्थापना ही केवळ तालुक्यातील गोरगरीब गरजू कष्टकरी सर्वसामान्य जनतेच्या मुलांना उत्तम दर्जाचे शिक्षण द्यावे व संस्कारक्षम पिढी निर्माण व्हावी या हेतूने झाली असल्याचे सांगितले.आपल्या मार्गदर्शन पर मनोगत मध्ये बोलत असताना संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचे महत्व पटवून दिले. कमलापूर या ग्रामस्थांचे व सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला चे नेहमीच सहकार्य असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना जिल्हा समन्वयक राख यांनी जीवनामध्ये संस्काराला फार महत्त्व आहे हे संस्कार तुम्हाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरातून मिळतील असे सांगितले.त्याचबरोबर मोबाईलचा वापर कमी करा व्यसनापासून दूर राहा आई-वडिलांची सेवा करा पर्यावरणाचे रक्षण करा. तसेच इथून पुढील आयुष्यामध्ये सदाचरण करणार असल्याची विद्यार्थ्यांकडून विद्यार्थिनी कडून शपथ घेण्यात आली .



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .